भारत सरकार नोंदणी क्रमांक PRGI No. MHMUL/25/A0079

RNP Registration पोस्टल परवाना क्रमांक JAL/442/2025-2027

साप्ताहिक

# मधुर खान्देश

प्रति, ..........

संपादक : राहुल बाबुलाल महाजन ( मो.नं.९८६०६३२६७६ ) ई आवृत्ती www.madhurkhandesh.com

Year : 2 | Issue : 27 | Wednesday Date 14 October 2026 to Tuesday 20 October 2026 | Jalgaon | Page : 4 | Price : 2

वर्ष २ | अंक - २७ | बुधवार दि. १४ ऑक्टोंबर २०२६ ते मंगळवार २० ऑक्टोंबर २०२६ | जळगाव | पृष्ठ - ४ | किंमत २ रु.

# ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन

## शासकीय इतमामात आणि हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार संपन्न

मधुर खान्देश वृत्तसेवा

ज्येष्ठ आणि अष्टपैलू अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद असून, संपूर्ण कलाविश्वावर आणि चाहत्यांवर शोककळा पसरली आहे. गोव्याहून त्यांचे पार्थिव पुणे जिल्ह्यातील सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या डोणजे गावातल्या नानाची वाडी या त्यांच्या निवासस्थानी आणण्यात आले. त्यानंतर रात्री उशिरा त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

या अंतिम विधीच्या वेळी त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. हजारो लोकांच्या उपस्थितीत, साश्रू नयनांनी लाडक्या अभिनेत्याला अखेरचा निरोप देण्यात आला. आपला हसरा चेहरा, अस्सल मराठमोळी शैली आणि स्पष्ट पण मनस्वी बोलण्याने प्रत्येकाला आपलेसे करणारे नाना पाटेकर सर्वांना दुःखात सोडून अनंताच्या प्रवासाला निघून गेले. या दुःखाच्या प्रसंगी चित्रपट, नाट्य, कला, क्रीडा, साहित्य आणि राजकारण या विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. यामध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मंत्री चंद्रकांत पाटील, उदय सामंत, खासदार सुनील तटकरे यांच्यासह अनेक दिग्गज व्यक्तींनी उपस्थित राहून नाना पाटेकरांना अंतिम श्रद्धांजली अर्पण केली.





सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।
शरण्ये त्र्यम्बके गौरी नारायणी नमोस्तुते ।।

## एमआयटी-डब्ल्यूपीयू विद्यार्थी परिषद निवडणूक: क्रिष्णा मनोज पाटील 'विद्यापीठ अध्यक्ष' पदाच्या शर्यतीत

पुणे:पुण्यातील नामांकित एमआयटी-वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (MIT-WPU) मधील आगामी विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून कॅम्पसमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाचा अभ्यासू आणि सक्रिय विद्यार्थी क्रिष्णा मनोज पाटील याने 'विद्यापीठ अध्यक्ष' पदासाठी आपली उमेदवारी जाहीर केली आहे.

क्रिष्णा पाटील याने अभियांत्रिकी शिक्षणासोबतच विविध विद्यार्थी उपक्रम, शैक्षणिक-सामाजिक कार्यक्रम आणि कॅम्पस मधील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर नेहमीच पुढाकार घेतला आहे. सिव्हिल इंजिनिअरिंगचा विद्यार्थी असल्याने त्याच्याकडे उत्तम नियोजन आणि नेतृत्वगुण असून, विद्यापीठातील सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांना एकत्र घेऊन काम करण्याचा त्याचा मानस आहे.

आपली उमेदवारी जाहीर करताना क्रिष्णा पाटील याने सांगितले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडवणे, कॅम्पस मधील सोयी-सुविधांमध्ये सुधारणा करणे, नवनवीन उपक्रमांना प्रोत्साहन देणे आणि प्रशासन व विद्यार्थी यांच्यात एक मजबूत दुवा म्हणून काम करणे हे माझे मुख्य उद्दिष्ट आहे. त्याच्या उमेदवारीमुळे विद्यार्थी परिषदेच्या शर्यतीतील चुरस वाढली असून कॅम्पसमध्ये त्याला इतर विद्यार्थ्यांकडून मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे.

## वाइन उद्योगाला ८ कोटी ८० लाखांचे अनुदान

मुंबई : राज्यातील वाइन उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभागाने १३ ऑक्टोबर रोजी शासन निर्णय जारी करत २०२६-२७ या आर्थिक वर्षात ८ कोटी ८० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून ३१ प्रलंबित अनुदान दावे निकाली काढण्यात येणार आहेत. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि द्राक्षांवर आधारित वाइन उद्योगाचा विकास करणे, हा या योजनेचा उद्देश आहे. विक्री झालेल्या वाइनवरील २० टक्के मूल्यवर्धित करापैकी १६ टक्के कराच्या रकमेइतके प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद असलेल्या या योजनेंतर्गत उद्योग आयुक्तालयाकडून निधी वितरित होईल. या निर्णयामुळे नाशिक जिल्ह्यातील सुला वाइनयार्ड्स, एन. डी. वाइन्स, आर्टिसन स्पिरिट्स, इंडोस्पिरिट बेव्हरेजेस, गुड ड्रॉप वाइन सेलर्स, नाशिक अरोमा, सेव्हन पीक्स वायनरी, व्हॅलोन वाइनयार्ड्स, चारोसा वाइनरीज, ग्रोव्हर झांपा वाइनयार्ड्स, तसेच सोलापूरची फ्रॅटेली वाइन्स आणि सांगलीची ग्रेप सिटी वाइनरी सहकारी संस्था यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

**मधुर खान्देश वृत्तपत्र आपल्या पर्यंत पोहचले का? आम्हाला कळवा**
**मो.९८६०६३२६७६**
**आता वृत्तपत्र पोस्टाने पाठविण्याची सुविधा उपलब्ध आहे.**

## नाना पाटेकरांचा सहवास लाभलेले पाचोऱ्याचे पत्रकार सचिन सोमवंशी यांनी सांगितल्या अपहरणच्या आठवणी!



पाचोरा: ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनानंतर पाचोरा येथील प्रसिद्ध पत्रकार सचिन सोमवंशी यांनी त्यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला आहे. २००४-०५ मधील बहुचर्चित अपहरण चित्रपटाच्या सातारा आणि नाशिक (येरवडा) येथील शूटिंगदरम्यान सोमवंशी यांना नानांचा प्रत्यक्ष सहवास लाभला होता. साताऱ्यात शूटिंग सुरू असलेल्या बंगल्यात धूम्रपानाला सक्त मनाई होती. त्यामुळे नाना पाटेकर आणि अजय देवगण यांना सिगारेट पिण्यासाठी कंपाऊंडच्या बाहेर जावे लागत असल्याची मजेशीर आठवण त्यांनी सांगितली.

पडद्यावर रागीट दिसणारे नाना प्रत्यक्षात अत्यंत साधे, मनमिळाऊ आणि विनाअहंकारी होते. त्यांच्यासोबत कोणीही सहज फोटो काढू शकत असे, अशा शब्दांत सोमवंशी यांनी त्यांच्या स्वभावाचे वर्णन केले. अपहरणच्या प्रदर्शनानंतर डिसेंबर २००५ मध्ये सातारा येथे झालेल्या भव्य कार्यक्रमासही सोमवंशी उपस्थित होते. नाना पाटेकर हे केवळ महान अभिनेते नसून शेतकरी आणि सर्वसामान्यांबद्दल नितांत आदर असणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते, अशी भावनिक प्रतिक्रिया पत्रकार सचिन सोमवंशी यांनी व्यक्त केली आहे.

# पाचोरा-मोंढाळा रस्त्यावर भीषण अपघात

## उपचारादरम्यान शिंदाड येथील तरुण जागीच मृत





मधुर खान्देश वृत्तसेवा

पाचोरा: पाचोरा ते मोंढाळा रस्त्यावर असलेल्या म्हसोबा मंदिराजवळ सात ते आठ वाजेच्या दरम्यान ट्रॅक्टर आणि दुचाकीची समोरून भीषण धडक झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.



समाधान पाटील (रा. शिंदाड, ता. पाचोरा) असे मृत झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळावरून लकी पाटील यांनी माहिती दिली. मंगळवारी रात्रीच्या सुमारास पाचोरा-मोंढाळा मार्गावर ट्रॅक्टर (क्र. MH 19 AP 3262) आणि दुचाकी (क्र. MH 19 CA 7985) यांच्यात हा भीषण अपघात झाला. धडक इतकी जोरदार होती की, दुचाकीवरील चालक समाधान पाटील हे गंभीर जखमी झाले होते.

अपघात घडल्यानंतर तात्काळ घटनास्थळी उपस्थित असलेले प्रवासी तसेच मधु काटे यांच्या सहकार्यांनी मानवीय दृष्टिकोन दाखवत तातडीने मदतीसाठी पुढे धावले. जखमी झालेल्या समाधान पाटील यांना पुढील उपचारासाठी तत्काळ रुग्णालयात हलवण्यात आले. परंतु, रुग्णालयात पोहचण्यापूर्वी किंवा उपचारादरम्यानच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या दुर्दैवी घटनेमुळे शिंदाड गावावर आणि मृतकाच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. याप्रकरणी पाचोरा पोलीस ठाण्यात पुढील कायदेशीर कारवाईचे काम सुरू होते.

# पाचोरा नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्याची नगरसेवक राहुल गायकवाड यांची मागणी

मधुर खान्देश वृत्तसेवा

पाचोरा : नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेचे कामकाज अधिक पारदर्शक व्हावे आणि सभेतील निर्णयांची अचूक नोंद राहावी, यासाठी सभेचे संपूर्ण व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात यावे, अशी मागणी भाजपचे नगरसेवक राहुल अंकुश गायकवाड यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगरसेवक राहुल गायकवाड यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, नगरपालिका अधिनियम १९६५ नुसार सर्वसाधारण सभेचे कामकाज पारदर्शक असणे अत्यंत आवश्यक आहे. सभेमध्ये होणारे महत्त्वाचे निर्णय, चर्चा आणि विविध ठराव यांची अचूक नोंद राहावी यासाठी सभेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे गरजेचे आहे. व्हिडिओ रेकॉर्डिंगमुळे कामकाजात पारदर्शकता वाढेल आणि नगरपालिकेच्या कारभारावर जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर, दिनांक १४ ऑक्टोबर २०२६ रोजी होणाऱ्या तसेच यापुढे संपूर्ण सर्वसाधारण सभेचे संपूर्ण व्हिडिओ रेकॉर्डिंग करून ते नगरपालिकेच्या दप्तरी/रेकॉर्डमध्ये जतन करण्याचे निर्देश द्यावेत, त्याचबरोबर शहरातील जडणघडण मध्ये समाविष्ट असलेल्या सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार बांधव यांना देखील या ठिकाणी आमंत्रित करण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच भविष्यात होणाऱ्या सर्व सभा लाईव्ह (थेट) किंवा रेकॉर्डेड स्वरूपात ठेवण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात यावा, अशी विनंतीही त्यांनी या निवेदनाद्वारे मुख्याधिकारी व नगराध्यक्षांकडे केली आहे.